दै. पूण्यनगरी - 14 ऑक्टोबर,2023

# विद्यापीठात सायबर सुरक्षेविषयी जनजागृती

जळगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाउंडेशन यांच्यात सामजंस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळ्या विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे. याबाबत माहिती देण्यात आली. प्रशाळेचे संचालक डॉ. सतिश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पौर्णिमा चौधरी, कुणीका खैरनार, दर्शना हिरे, वैष्णवी सांळुके, नेहा पवार, लिना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चौधरी, गजानन घुले यांनी विविध प्रशाळांमध्ये जावून सायबर सुरक्षेततेबाबत माहिती दिली.